महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २१७ वा | दिनांक : २३/०६/२०२५ | वार : सोमवार

# कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा - कृषिमंत्री कोकाटे





**अहिल्यानगर** : राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मुद्द्यावर कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. शेतकऱ्यांनी कर्ज भरायलाच हवे, असे ते म्हणालेत. तर कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यांचा विचार लवकरच कार्यान्वित होईल, असे विधान करत त्यांनी या विषयावर पुन्हा एकदा चर्चा सुरू केली आहे. कोपरगाव येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना कोकाटे यांनी राज्यातील कृषी आणि राजकीय घडामोडींवर भाष्य केले.

महायुतीने विधानसभा निवडणुकीपूर्वी जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत येऊन सहा महिन्यांहून अधिक कालावधी उलटला, मात्र, कर्जमाफीबाबत ठोस घोषणा झालेली नाही. त्यामुळे शेतकरी वर्गातून सरकारविरोधात नाराजी सूर उमटत आहे. या पार्श्वभूमीवर कोकाटे यांच्या विधानाकडे विशेष लक्ष वेधले जात आहे.

माणिकराव कोकाटे यांना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत विचारले असता कर्जमाफीचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यांचा विचार लवकरच कार्यान्वित होईल. शेतकऱ्यांनी कर्ज भरलीच पाहिजेत. मात्र कर्जमाफी संदर्भातील निर्णय मुख्यमंत्री घेतील, असे त्यांनी म्हटले आहे.

कृषीमंत्री कोकाटे यांनी बोगस बियाणे व कीटकनाशकांच्या विक्रीविरोधातही ठाम भूमिका घेतली. बोगस बियाणे आणि औषधांसंदर्भात ज्या कृषीसेवा केंद्राच्या बाबतीत तक्रार दाखल होईल, त्यावर तात्काळ कारवाई केली जाईल. माझ्याकडे तक्रार आली तर मी लगेच कारवाई करणार आहे, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले, सरकारने शेतीत भांडवली गुंतवणूक करावी ही माझी धारणा आहे. यासाठी पुढील पाच वर्षांत सरकार 25 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. परदेशी पातळीवर मिळणाऱ्या सवलती आणि सुविधा भारतीय शेतकऱ्यांनाही मिळाल्या पाहिजेत. सरकारी गुंतवणुकीमुळे शेतकऱ्यांचा नक्कीच फायदा होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

नाशिकच्या पालकमंत्रीपदाबाबत माणिकराव कोकाटे यांना विचारले असता, नाशिकच्या बाबतीत फारसे वाद नसल्याचे ते म्हणाले. पालकमंत्रीपदासाठी कुणाचाही दावा नाही. मुख्यमंत्री जो निर्णय घेतील, तो सर्वांना मान्य असेल, असेही ते म्हणालेत. दरम्यान, नाशिकच्या पालकमंत्रीपदाबाबत महायुतीमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून रस्सीखेच सुरू आहे. भाजपचे गिरीश महाजन, शिंदे गटाचे दादा भुसे यांची नावे आघाडीवर आहेत. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माणिकराव कोकाटे आणि अलीकडेच मंत्रीपद मिळवलेले छगन भुजबळ हे दोघेही शर्यतीत आहेत. त्यामुळे या पदासाठी आता चार संभाव्य दावेदारांच्या नावांची चर्चा सुरू आहे.

# अबू आझमींचे वारीसंदर्भात वादग्रस्त विधान





**सोलापूर** : समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी वारीसंदर्भात केलेल्या वक्तव्यामुळे मोठा वाद होण्याची शक्यता आहे. वारीमुळे रस्ते जाम होतात, पण मुस्लीम समाज कधीच तक्रार करत नाही. मात्र जर मुसलमानांनी नमाज पठण केले, तर तक्रार होते, असे विधान अबू आझमी यांनी केले. या याबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी आझमी यांच्यावर सडकून टीका केली. अबू प्रसिद्धीसाठी अशी वक्तव्ये करतात, मी त्यांना प्रसिद्धीच्या लायक समजत नाही, असा टोला फडणवीसांनी लगावला.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी हे कायम आपल्या वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत असतात. काही दिवसांपूर्वी त्यांनी मोगल बादशाह औरंगजेबाचे उदात्तीकरण करत त्याला चांगला शासक म्हटले होते. त्यांच्या या विधानानंतर राजकारण चांगलेच तापले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा अबू आझमी यांनी वारीसंदर्भात वादग्रस्त विधान केले आहे. या विधानामुळेही नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

अबू आझमी यांनी केलेल्या विधानाबाबत तुम्हाला काय वाटते, असे पत्रकारांनी विचारले. यावर बोलताना, मला वाटते की अबु आझमी यांना वादग्रस्त विधाने करण्याची आवड आहे. वादग्रस्त विधाने केली की प्रसिद्धी जास्त मिळते, असे त्यांना वाटते. त्यामुळेच मी त्यांना प्रसिद्धीच्या लायक समजत नाही. त्यामुळेच मी या प्रश्नाचे उत्तर देणार नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते नागपुरात माध्यम प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत होते.

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी आज सोलापुरात माध्यमांशी बोलताना वारीसंदर्भात वादग्रस्त वक्तव्य केले. आजपर्यंत कोणत्याही मुस्लिम व्यक्तीने रस्त्यावर उत्सव का साजरे होतात याची तक्रार केली नाही. पण ज्यावेळी मशीद पूर्ण भरते तेव्हा काही मशिदीतील लोकं 5 ते 10 मिनिटे रस्त्यावर नमाज पठण करतात, त्यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणतात रस्त्यावर नमाज पठण केले, तर पासपोर्ट रद्द करू. मी पुण्यातून येताना मला लोकांनी सांगितले लवकर जाऊ अन्यथा पालख्यामुळे रस्ता जाम होईल. रस्ता जाम होतोय, पण आम्ही कधी तक्रार केली नाही. पण नमाजसाठी तक्रार होते, असे अबू आझमी म्हणाले. याचा अर्थ जाणीवपूर्वक काही लोक मुस्लिम बाबतीत हे करत आहेत, असेही त्यांनी म्हटले.

# मराठी अभिनेता तुषार घाडीगावकरची आत्महत्या : मृतदेह पंख्याला लटकलेला आढळला

तेजस्वी प्रकाशचा टीव्ही शो 'मन कस्तूर रे' मध्ये सहकलाकार असलेला मराठी अभिनेता तुषार घाडीगावकरने २० जून रोजी आत्महत्या केली. त्याचा मृतदेह मुंबईतील गोरेगाव येथील एका फ्लॅटमध्ये आढळला. २१ जून रोजी भांडुप स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. वृत्तानुसार, काम न मिळाल्याने अभिनेता मानसिक तणावाखाली होता, जरी कुटुंबाने दुसऱ्या कोनातून चौकशीची मागणी केली आहे.

नवभारत टाईम्सने पोलिस सूत्रांच्या हवाल्याने म्हटले आहे की, ही घटना २० जूनच्या रात्री घडली. तुषार गोरेगाव येथील एसआरए हाऊसिंग सोसायटीमध्ये राहत होता. रात्री तो घरी एकटाच होता. कुटुंबाने त्याला अनेक वेळा फोन केला, पण त्याने कोणताही फोन उचलला नाही. कुटुंबाने शेजाऱ्यांकडून मदत मागितली. शेजाऱ्यांनी बराच वेळ दरवाजा ठोठावला, पण तुषारने दरवाजा उघडला नाही. शेजाऱ्यांनी दरवाजा तोडला तेव्हा त्याचा मृतदेह छताच्या पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळला.

घरात कोणतीही सुसाईड नोट सापडलेली नाही. दुसरीकडे, तुषारच्या पत्नीने आणि त्याच्या वडिलांनी त्याच्या मृत्यूमागे कट असल्याचे म्हटले आहे. सध्या या प्रकरणात अपघाती मृत्यूचा अहवाल दाखल करण्यात आला आहे आणि तपास सुरू आहे.

तुषारचा जवळचा मित्र असलेल्या अंकुर विठ्ठलरावने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे ज्यामध्ये असा दावा केला आहे की, काम न मिळाल्याने अभिनेत्याने आत्महत्या केली. त्याने लिहिले आहे की, 'माझ्या मित्रा, काम का येते आणि जाते. आपण मार्ग काढला पाहिजे. मी सहमत आहे की सध्याची परिस्थिती कठीण आहे, परंतु हा उपाय असू शकत नाही. तुषार, तू हरलास आणि आम्ही सर्वजण तुझ्यासोबत हरलो.'

तुषार हा मराठी चित्रपट आणि टीव्ही इंडस्ट्रीतील एक प्रसिद्ध अभिनेता होता. डीजी रूपारेल कॉलेजमधून नाट्यशास्त्राचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्याने टीव्ही शोमध्ये छोट्या भूमिका साकारण्यास सुरुवात केली.

त्याने लवंगी मिर्ची, मन कस्तुरी रे आणि सुखाच्या सरती हे मन बावरे सारख्या अनेक मराठी मालिकांमध्ये काम केले आहे. या शो व्यतिरिक्त, त्याने भाऊबली, उनाड आणि झोम्बेली सारख्या मराठी चित्रपटांचा भाग म्हणून काम केले आहे. तो शेवटचा मराठी शो सखा माझा पांडुरंग मध्ये दिसला होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५


## पूर्वीची भाजप ही भ्रष्टाचारमुक्त आणि गुन्हेगारमुक्त होती - एकनाथ खडसेंची टीका



**सोलापूर :** शिवसेना ठाकरे गटाचे नेते सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर भाजपवर टीकेची झोड उठवण्यात आली. सुधाकर बडगुजर यांचा 1993 च्या मुंबई ब्लास्टमधील आरोपी सलीम कुत्तासोबतचे फोटो भाजप नेते नितेश राणे यांनी दोन वर्षांपूर्वी समोर आणले होते तसेच तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयटी चौकशीची देखील घोषणा केली होती. परंतु तेच आता भाजपमध्ये गेले आहेत. यावरून राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी टीका केली आहे.

पंढरपूर येथे एकनाथ खडसे यांनी पांडुरंगाचे दर्शन घेतल्यावर माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले, पूर्वीची भाजप ही भ्रष्टाचारमुक्त आणि गुन्हेगारमुक्त अशा चौकटीतील होती. आता जेलमध्ये जाऊन आलेले किंवा ईडी चौकशीत अडकलेले लोक पक्षात घेतले जात आहेत. अगदी दाऊदचा हस्तक असलेला सलीम कुत्तासोबत नाचणाऱ्या सुधाकर बडगुजरला देखील भाजपमध्ये घेतले हे अति झाले.

ज्या भ्रष्ट नेत्यांच्या विरोधात मी विरोधी पक्ष नेता असताना टीका केली होती, ते आज पक्षात असून 70 हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केले होते, तेही आज यांच्यासोबत आहेत, असा देखील टोला एकनाथ खडसे यांनी लगावला आहे. भाजप हा विषय माझ्यासाठी पूर्णपणे संपला असून मी अंधारात असताना मला साथ देणाऱ्या शरद पवार यांच्यासोबतच मी असणार असल्याचे खडसे यांनी स्पष्ट केले आहे.

भाजपच्या या अवस्थेला राज्याचे नेतृत्व जबाबदार आहेत का असे विचारले असता खडसेंनी मात्र देवेंद्र फडणवीस यांना क्लीन चीट देत यासाठी त्यांना एकट्याला दोष देणे चुकीचे असल्याचे म्हटले. प्रक्रियेत असणारे सर्व आणि पक्षात प्रवेश देणारे संघटनेचे नेते यास जबाबदार आहेत. मी भाजपमध्ये असताना गिरीश महाजन माझा सामान्य कार्यकर्ता होता, मी मंत्री असताना त्याला मंत्रिमंडळात स्थान नव्हते. मी गेल्यावर तो कार्यकर्त्याचा मंत्री झाला, अशी गिरीश महाजन यांच्यावर टीका केली आहे.

सुधाकर बडगुजर यांचा प्रवेश झाल्यावर एकनाथ खडसे म्हणाले होते त्यापेक्षा मी वाईट नाही, मला का घेत नाहीत. खडसे पक्षात येण्यासाठी किती उत्सुक आहेत हे दिसते, असा पलटवार गिरीश महाजन यांनी केला आहे. पुढे ते म्हणाले, मी लहान कार्यकर्ता आहे, ते दिल्लीत बोलले, त्यांचे कनेक्शन दिल्लीत आहे. मी त्यांच्याबद्दल काही टिपणी करणार नाही, कारण ते राष्ट्रीय नेते आहेत. दिल्लीत त्यांनी भाजपचा दुपट्टा गळ्यात टाकल्याचे त्यांनी सांगितले होते. पण, त्याचे फोटो समोर आले नाहीत, असा टोलाही लगावला.

## पडेगाव येथे शॅडो क्लब चे उदघाटन



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** २२ जून रोजी शॅडो पूल बिलीयड्स क्रीडा क्लब चे उदघाटन करण्यात आले.समाजात दिवसेंदिवस मोबाईल स्क्रीन बघण्यात तरुणांचा जास्त वेळ जात आहे व तरुण पिढी व्यसनधिंतेकडे वाटचाल करतानाचे दिसत आहे म्हणून तरुणांची एकाग्रता वाढविण्यासाठी तरुण उद्योजकांनी पुढे यायला हवे हाच स्पष्ट उद्देश डोळ्यासमोर ठेऊन पडेगाव येथिल तरुण केतन वाघमारे यांनी स्वखर्चातून तरुण पिढीसाठी शॅडो क्लबची स्थापना केली आहे त्याचे उदघाटन पडेगावचे माजी नगरसेवक सुभाष शेजवळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पडेगाव येथिल सामाजिक कार्यकर्ते दादाराव शेजवळ, संजय धर्मारक्षक, किसन पेहरकर, प्रा.डॉ.ज्ञानोबा कसाब, प्रा.डॉ.अर्जुन उबाळे, माजी सैनिक कोकाटे, चेतन वाघमारे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शिवाजी गायकवाड यांनी तर क्लब चे संचालक केतन वाघमारे, सिमरन बायस, दिलीप वाघमारे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका नितेश राणेंचा कोळी बांधवांना सल्ला



**मुंबई :** आपण मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका, कारण देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यामुळे, देवाभाऊ पुढचे 100 वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा, असा सल्ला भाजप नेते व मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी कोळी बांधवांना दिला आहे. वेसावा खाडीजवळ स्थानिक मच्छीमारांची भेट घेऊन राणेंनी चर्चा केली. यावेळी त्यांनी हे विधान केले आहे.

नितेश राणे म्हणाले, मी राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून आलेलो आहे. आपण मी मुख्यमंत्री होण्याची वाट पाहू नका, कारण देवेंद्र फडणवीस सक्षम आहेत. त्यामुळे, देवाभाऊ पुढचे 100 वर्षे मुख्यमंत्री व्हावे अशी प्रार्थना करा, असा सल्ला त्यांनी कोळी बांधवांना दिला. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा चर्चा सुरू झाली आहे.

पुढे बोलताना नितेश राणे म्हणाले, मत्स्य व्यवसायाला कृषी चा दर्जा मिळावा ही मागणी वर्षानुवर्षे आहे. राज्यात महायुतीचे सरकार आले आणि पहिल्या 100 दिवसात मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. आपण आधी सरकार म्हणून मदत मागायला जायचो तेव्हा अधिकारी हात आकडते घ्यायचे, तुटपुंजी मदत द्यायचे. पण, डहाणूमध्ये 1 कोटी 89 लाख रुपयांचे नुकसान झाले. त्यावेळी मी मदत पुनर्वसन मंत्र्यांकडे गेलो आणि नुकसान जास्तीत जास्त भरून देण्याचे ठरविले. जर आधीच्या अनुषंगाने मदत केली तर मच्छिमारांचा अपमान आहे. मी मुख्यमंत्र्यांना संगितले त्यांनी आदेश दिले आणि आता 100 टक्के नुकसान भरपाई देण्याचे ठरविले. मी गुजरातवरुन थेट तुमचे आशीर्वाद घ्यायला आलो आहे. आता कोणीतीही चिंता करू नका जास्तीत जास्त नुकसान भरपाई देऊ.

आम्ही ड्रोनने पाहणी करत आहोत, जेणेकरून एलईडी वाल्यांच्या ढुंगणाला आग लागेल. जर कोणताही अधिकारी कोणाकडूनही वजन घेत असेल तर त्याला असा जिल्हा देईल की पुन्हा मासे दिसणार नाहीत. मी पूर्णपणे कार्यक्रम करणार आहे, आम्ही कोणालाही सोडणार नाही, अशा शब्दात राणेंनी अधिकाऱ्यांना इशाराही दिला आहे.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903


## प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा व वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा




प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा व वत्सलाबाई पाटील माध्यमिक विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक शैलेंद्र पाटील सर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश ढमाले सर उपस्थित होते योगशिक्षक दिगंबरराव खराडकर यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५


## महात्मा बसवेश्वर पतसंस्था सहकार समृद्धी पॅनलचे सर्व उमेदवार बहुमताने विजयी



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित या पतसंस्थेने गेल्या पंधरा वर्षात एकदाही निवडणुक झाली नाही. सलग तीन टर्म बिनविरोध संचालक मंडळ निवडून येऊन कार्यरत राहिले. प्रथमच या पतसंस्थेची पंचवार्षिक निवडणुक जाहीर झाली. शनिवारी (ता. २१) रोजी प्रतिभा निकेतन विद्यालय मतदान केंद्रात दुपारी चार वाजेपर्यंत मतदान पार पडले. मतदानानंतर सायंकाळी पाचच्या सुमारास मत मोजणीला प्रारंभ करण्यात आला. रात्री उशिरापर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी बी. व्ही. काळे यांनी निकाल जाहीर केला. महात्मा बसवेश्वर पतसंस्था सहकार समृद्धी पॅनलने दणदणीत विजय मिळविला. या पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार अधिक मताधिक्यांनी विजयी झाले आहेत. या निवडणुकीत महात्मा बसवेश्वर पतसंस्था सभासद विकास पॅनल व महात्मा बसवेश्वर पतसंस्था सहकार समृद्धी पॅनल हे आमने-सामने निवडणुकीच्या रिंगणात होते. दोन्ही पॅनलने निवडणूक कालावधीमध्ये एकमेकांसमोर आरोप-प्रत्यारोप करत निवडणूक लढविली. परंतु विद्यमान संचालकावर मतदारांनी अधिक विश्वास ठेवून या निवडणुकीत प्रतिस्पर्धी पॅनलला पराभूत केले. या निवडणुकीत महात्मा बसवेश्वर पतसंस्था सहकार समृद्धी पॅनलचे प्रमुख चंद्रशेखर मुदकण्णा व विद्यमान चेअरमन शिवशरण वरनाळे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढविण्यात आली. या निवडणुकीत सर्वसाधारण मतदार संघातून जाधव कमलाकर काशीनाथराव, पाटील बाबासाहेब मल्लिनाथ, बिराजदार श्रीशैल सिद्रामप्पा, मुदकण्णा मनिष लिंबणप्पा, मुदकण्णा शरणप्पा सिद्रामप्पा, वरनाळे अमृत भिमराव, वरनाळे शिवशरण गुरुलिंगप्पा, समन शिवराज हुवण्णा, सर्वसाधारण महिला राखीव मतदार संघातून जाधव संगीता अशोक, सोनवणे वंदना भागवत, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातून लोखंडे इंद्रजित सिद्राम, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागासवर्गीय मतदार संघातून बोंदर मनोज मारुती तर इतर मागासवर्गीय मतदार संघातून हिरमुखे अनंत सायबण्णा हे विमान चिन्ह घेऊन १३ पैकी १३ जागेवरती निवडून आले आहेत. विजयी पॅनलचे विमान चिन्ह म्हणजे विकास, वेग आणि विश्वास यावर मतदार राजाने विश्वास ठेवून सर्वच्या सर्व उमेदवारांना निवडून दिले. तर प्रतिस्पर्धी महात्मा बसवेश्वर पतसंस्था सभासद विकास पॅनलचे प्रमुख बसवराज वरनाळे यांच्या नेतृत्वाखाली सदर निवडणूक लढविण्यात आली होती. पराभूत उमेदवारमध्ये गायकवाड आप्पाराव शिवाजी, तुगावे शिवानंद भोजप्पा, पठाण मन्नान मूर्तझाखान, बिराजदार गुंडप्पा चन्नप्पा, मुदकण्णा बसवराज रामचंद्र, वरनाळे बसवराज गुरुलिंगप्पा, शिंदे रविराज नारायण, शिरसे दत्तात्रय शंकर, कंटेकुरे शिवलीला विकास, हत्तरगे मिनाक्षी सिद्धाराम, बोडरे मारुती सुभाना, घोडके संतोष मोतीराम, स्वामी योगेश कपिलेश्वर यांना पराभवाला सामोरे जावे लागले. निकाल जाहीर झाल्यानंतर नूतन संचालक, सभासद व कार्यकर्त्यांनी जल्लोष-घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा करून गुलालाची उधळण करून अतिशबाजी केली. दरम्यान माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या उमरगा येथील कार्यालयात सर्व नूतन संचालकांचा ज्ञानराज चौगुले, युवा नेते किरण गायकवाड, भिमराव वरनाळे अॅड. आकांक्षा चौगुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## क्षमतेप्रमाणे संधी दिली जात नाही : भास्कर जाधवांनी व्यक्त केल्या भावना



**मुंबई** : शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा आमदार भास्कर जाधव यांनी अलीकडेच राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले असून, त्याचबरोबर त्यांना पक्षात डावलले जात असल्याची भावना व्यक्त केली आहे. क्षमतेप्रमाणे संधी दिली जात नाही, अशी खंत त्यांनी बोलून दाखवली. तसेच शरद पवार यांची साथ सोडणे हे कधीकधी चुकीचे वाटते, असेही वक्तव्य त्यांनी केले होते. तसेच संजय राऊत यांनी देखील भास्कर जाधव यांनी खंत व्यक्त केली असून पक्षप्रमुख दखल घेतील असे म्हटले आहे.

भास्कर जाधव म्हणाले, शरद पवार यांची साथ सोडली, त्यामुळे मला काहीतरी चुकल्यासारखे वाटते, असे अजिबात नाही. तसे स्पष्टीकरण मी दिलेले आहे. मी शरद पवार यांना सोडल्याचा निर्णय चुकीचा होता, हे मी स्पष्टपणे बोललो. पण मला त्याची खंत वाटते असे अजिबात नाही. मला मंत्रिपद मिळायला पाहिजे होते, मी तेव्हा बोललो. मी आजही बोलेन. उद्याही बोलेन. मला मंत्रिपद का मिळायला नको, हे मला कोणी सांगायला हवे. मला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून काय रडत बसायचा का? उलट लढायचं. मला मंत्रिपद मिळाले नाही म्हणून मी जे फुटून गेले त्यांच्याबरोबरही मी गेलो नाही. मी लढत आहे.

शिवसेनेचा शाखाप्रमुखच हाच शिवसेनेचा कणा होता, पण कुठेतरी शिवसेनेत शाखाप्रमुखच बाजूला होत असल्याचे मला दिसले, म्हणून त्याच अनुषंगाने आज शिवसेना पक्षाच्यावतीने शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यकर्ते कमी होत आहेत म्हणून निवृत्ती घ्यायचं काहीच कारण नाही. 39 जागांपैकी मी एकटा निवडून आलो आहे, परंतु शेवटी आठ-आठ वेळा वेगवेगळ्या निवडणुका जिंकल्यानंतर असे वाटते की आता थांबायचा विचार करावा, यापेक्षा वेगळे कारण नाही, असे म्हणत भास्कर जाधव यांनी निवृत्तीच्या चर्चांवर स्पष्टीकरण दिले.

भास्कर जाधव म्हणाले, संजय राऊत मला दरवेळी सावरण्याची भाषा करतात. पण, मला भाषण करायला मिळत नाही म्हणून मी नाराज होत नाही. सगळ्या गोष्टींचे मला चांगल भान आहे. पक्ष मला भाषण करायला देत नाही म्हणून मी नाराज असा संदेश देण्याचा संजय राऊत यांचा प्रयत्न असतो. मात्र, पक्षाकडूनही कधीही तसे होत नाही. व्यासपीठावर शिवसेनेतील ज्येष्ठ नेते असतात, आदित्य ठाकरे हेही असतात. तरीही मला तिसऱ्या क्रमांकावर भाषण करायची संधी दिली जाते. माझ्यानंतर संजय राऊत आणि त्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे भाषण करतात

संजय राऊत म्हणाले, भास्कर जाधव काय बोलले. हे त्यांचे वक्तव्य मी ऐकलेले नाही. पण अशा प्रकारे त्यांना मन मोकळे करायचे असेल तर ते पक्षाच्या व्यासपीठावर बोलायला काहीच हरकत नाही. ते आमचे जवळचे सहकारी आहेत. मित्र आहेत. शिवसेनेच्या वर्धापनदिनी व्यासपीठावर भास्कर जाधव यांनी भाषण केले. त्यांना जे म्हणायचे आहे ते सातत्याने पक्षात त्यांची भूमिका मांडत असतात. यापुढेही ते त्यांच्या भूमिका मांडत राहतील. भास्कर जाधव यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आहेत. पक्षप्रमुख त्यांची दखल घेतील.

दरम्यान, आगामी स्थानिक निवडणुका लवकरच होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. अनेक नेते, पदाधिकारी संधी मिळवण्यासाठी दुसऱ्या पक्षात देखील जात आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे नाशिक येथील नेते सुधाकर बडगुजर यांनी देखील काही दिवसांपूर्वी ठाकरे गटाला रामराम करत भाजपमध्ये प्रवेश केला.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २२ जून २०२५


## निवडणुकीचे फोटो-व्हिडिओ ४५ दिवसांत डिलीट होणार! - प्रकाश आंबेडकर संतप्त



**मुंबई** : निवडणूक आयोगाने घेतलेल्या एका निर्णयामुळे मोठा वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यानुसार, निवडणुकीचे फोटो आणि व्हिडिओ केवळ ४५ दिवसांसाठीच जतन केले जाणार असून, त्यानंतर ते हटवण्यात येणार आहेत. या निर्णयावर वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी जोरदार आक्षेप नोंदवला आहे. ही कारवाई लोकशाही, पारदर्शकता आणि जनतेच्या विश्वासाविरोधात असून ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा असल्याचे प्रकाश आंबेडकरांनी म्हटले आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका घेणे ही निवडणूक आयोगाची प्राथमिक जबाबदारी आहे. मात्र त्यांनीच आता पारदर्शकतेच्या विरोधात पाऊल उचलले आहे, हे अतिशय गंभीर चिंतेचे कारण आहे.

प्रकाश आंबेडकरांनी X वर पोस्ट करत म्हटलंय की, डिसेंबर २०२४ मध्ये निवडणूक आयोगाने निवडणूक नियम १९६१ मध्ये केलेल्या सुधारणेमुळे अनेक निवडणूक संबंधित नोंदींवर सार्वजनिक प्रवेश प्रतिबंधित झाला आहे. या पार्श्वभूमीवर १६ जानेवारी २०२५ रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह इतर नेत्यांना पत्र लिहून महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील ७५,९७,०६७ मतांची संध्याकाळी ५ नंतर झालेली वाढ व सुधारित नियमावलीबाबत मी चिंता व्यक्त केली होती. मात्र, त्यांच्या या सूचनांकडे कोणीही गांभीर्याने लक्ष दिले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

प्रकाश आंबेडकरांनी म्हटलंय की, विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ५ नंतर वाढलेल्या मतदानाच्या संदर्भात चेतन चंद्रकांत अहिरे विरुद्ध भारतीय संघ व इतर या सुरू असलेल्या केसची महत्त्वपूर्ण पुढील सुनावणी सोमवार, २३ जून २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयात होणार आहे. याप्रकरणी याआधी उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला न्यायालयात उत्तर द्यायला सांगितले होते, असेही त्यांनी X वर पोस्ट करत म्हटले आहे

## हुंडा घेतला तर लग्नाला जाऊ नका : सुप्रिया सुळेंचा थेट इशारा



**पुणे** : मुलगी आत्महत्या करते आणि आपण अजूनही हुंड्याविषयी बोलतोय, हीच आपल्या समाजाची शोकांतिका आहे, अशा शब्दांत सुप्रिया सुळे यांनी हुंडा प्रथेवर ताशेरे ओढले. तर महाराष्ट्र हुंडामुक्त व्हावा यासाठी समाजाच्या सर्व स्तरावर प्रयत्न होणं आवश्यक आहे. पुण्यात एका सुशिक्षित कुटुंबातील मुलीने केवळ हुंड्याच्या दबावामुळे आत्महत्या केल्याच्या पार्श्वभूमीवर त्या बोलत होत्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, लग्न समारंभात जाताना हुंडा घेतला किंवा दिला आहे का, याचा विचार करावा. जर हुंडा घेतला असेल तर अशा लग्नात सहभागी होऊ नये. लग्नाच्या रुखवतात गाडी दिसली, तर ती कोणी दिली, कोणाच्या नावावर आहे, हे विचारणे गरजेचे आहे. अशा प्रकारे प्रश्न विचारले गेले तरच समाजात योग्य संदेश जाईल.सुळे यांनी जुलै महिन्यापासून पुढील एक वर्ष राज्यभर शाळा, कॉलेज आणि विविध संस्था यांच्यामार्फत हुंडाविरोधी जनजागृती मोहीम राबवण्याची घोषणा केली. या मोहिमेद्वारे तरुण-तरुणींसह पालकांमध्येही जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

पुण्यात घडलेली आत्महत्येची घटना एका सुशिक्षित कुटुंबातली आहे. या घटनेबाबत बोलताना सुळे म्हणाल्या की, आजही काही कुटुंबांत सून माहेरी गेल्यावर गाडी, मोबाईल, इतर वस्तू घेऊन याव्यात यासाठी तिला दबाव टाकला जातो, ही मानसिकता बदलण्याची गरज आहे, मोबाईल हवा असेल तर स्वतःच्या पैशातून घ्या असे त्यांनी म्हटले आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेतून महिलांना पैसे मिळाले, हे सकारात्मक आहे. मात्र त्यातून महिलांच्या आयुष्यात मोठा बदल झाला का, हे पाहणे गरजेचे आहे. लाडक्या बहीणींना 2100 रुपये कधी मिळतील, याबाबत निश्चितता नाही, असेही त्यांनी नमूद केले. जसे शेतकरी कर्जमाफीच्या वेळेस वेळ आली की देऊ असे सांगितले जाते, तसे इथेही घडते.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, सरकारने महिलांना फक्त आर्थिक सहाय्य न देता, त्यांना व्यवसायासाठी संधी द्यायला हव्यात. त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. इच्छाशक्ती आणि सामाजिक परिवर्तन ही संकल्पना फक्त निवडणुकीपुरती न राहता, ती कृतीत उतरली पाहिजे. पूर्वी सायबर क्राईम हा मुद्दा नव्हता, पण आज मोबाईलच्या वापरामुळे महिलांवरील गुन्हे वाढले आहेत. त्यामुळे सायबर सुरक्षेबाबत महिलांमध्ये जागरूकता वाढवणे गरजेचे आहे.

## सचिन पिळगावकरांनी गब्बर सिंगला डायलॉग शिकवले हे पचनी पडतच नाही



**मुंबई** : मराठी सिनेसृष्टीचे ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर यांनी अलीकडेच एका मुलाखतीत ‘शोले’ चित्रपटातील “कितने आदमी थे...” हा प्रसिद्ध डायलॉग अमजद खान यांना नीट बोलता येत नव्हता, असा खुलासा केला. त्यांनी सांगितले की, अमजद खान जेव्हा हा डायलॉग बोलत होते, तेव्हा त्याचा आवाज पातळ ऐकू येत होता. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर त्यांनी अमजद खान यांना स्टुडिओत नेऊन त्यांच्याच आवाजात पुन्हा हा डायलॉग रेकॉर्ड करून घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे. या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सचिन पिळगावकर यांच्यावर निशाणा साधला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सचिन पिळगावकर यांना त्यांच्या या मुलाखतीवरून डिवचले आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले, शोले हा सिनेमा १९७५ साली रिलीज झाला. त्यावेळी सिनेरसिकांनी शोले सिनेमा अक्षरशः डोक्यावर घेतला होता. त्यातील एक-एक डायलॉग त्यावेळच्या पिढीच्या तोंडावर होता. डाकू, दरोडेखोर यांच्या भूमिका असलेले अनेक चित्रपट येऊन गेले. मात्र, शोलेमध्ये अमजद खान यांनी साकारलेला गब्बरसिंग जेवढा गाजला, मला नाही वाटत तेवढा कोणता अभिनेता दरोडेखोराच्या भूमिकेमध्ये गाजला असेल.

गब्बरसिंग अन् अमजद खान हे हिंदी सिनेसृष्टीतील अजरामर नावे आहेत. पण, हे काही मनाला पटले नाही की, गब्बरसिंग म्हणजेच अमजद खान यांना डायलॉग फेकण्याचे कौशल्य- आदब हे त्या सिनेमातील बालकलाकार सचिन पिळगावकर याने शिकवली. कारण, अमजद खान यांचे वडील झकारिया खान अर्थात जयंत हेदेखील १९५०-६० च्या दशकातील नामांकित अभिनेते होते. म्हणजेच चित्रपटसृष्टीत खानदान असलेल्या अमजद खान यांना सचिन पिळगावकर याने संवादफेक किंवा डायलॉग फेकण्याची स्टाईल शिकवावी, हे पचनी पडतच नाही. आज अमजद खान आपल्यात नाहीत आज ही जो कोणी शोले बघेल तो अमजद खान म्हणजेच गब्बर सिंगला विसरूच शकत नाही.

सचिन पिळगावकर यांनी मुलाखतीत म्हटले होते की, शोले सिनेमा आल्यानंतर अनेकांना असे वाटले की, अमजदचा आवाज हा गब्बर सिंहचा आवाज वाटत नाहीय. तो थोडासा पातळ वाटतोय. त्याला मी माईकसमोर उभे केले आणि आमचे सूद नावाचे तेव्हा रेकॉर्डिस्ट होते, असिस्टंट होते ते मंगेश देसाईंचे. त्यांना सांगितले ट्रेबल एकदम बंद करदो और बेस बढादो. मी अमजदला सांगितले माईकच्या जवळ उभा राहा, आणि वरच्या पट्टीत नको बोलूस खालच्या पट्टीत बोल. कारण माझ्यामागे तो अनुभव होता, जो अमजदच्या मागे नव्हता आणि पहिला डायलॉग "कितने आदमी थे..." आधी त्याने वरच्या पट्टीत ओरडून म्हटलेले. मी त्याला सांगितले नाही, असे नाही. नीचे के सूर मे बोल. पट्टी पुरी नीचे कर. कारण मी गायक सुद्धा आहे. मला ऑक्टिम्स कळतात. त्यामुळे खालच्या सुरात बोल, कितने आदमी थे, असे सचिन पिळगावकर यांनी म्हटले होते.


**१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी**

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

**DMLT** कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स

**PGDMLT** कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

**X-RAY** कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी, १२ वी पास

**C.T.SCAN** कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी, १२ वी पास

**E.C.G.** कालावधी १ वर्ष, पात्रता : १० वी, १२ वी पास

**O.T. TECHNICIAN** कालावधी २ वर्ष, पात्रता : १० वी, १२ वी पास

**PG RADIOLOGY** कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर), पात्रता : B.Sc. Physics

**रेडिओलॉजी** कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

**फिजिओथेरपी** कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

**ऑप्टोमेट्री** कालावधी २ वर्ष, पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903